Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक ४ ] शुक्रवार, एप्रिल २४, २०२६/वैशाख ४, शके १९४८ [पृष्ठे ३ किंमत : रुपये १५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहे.

## भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

**संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ. केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश**

भाग १ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ११.

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), ल. सिं. कामे, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये कलम १९ चे घोषणापत्र** (Declaration)

**वाचा :** जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्र. अ. का.-प्र. अ.-भूसंपादन-कावि-४२८-२०२४, दिनांक २२ मे, २०२४.

क्रमांक म.अ.-ल.सिं.कामे-कावि-२१२-२०२६.—

ज्याअर्थी, शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टी. पी. एस. २८०६-३७९-प्र.क्र. २४३-२००६, न. वि. ३०, दिनांक ०६ जून, २००७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ मधील पोट-कलम (१) अन्वये महाराष्ट्र शासनाने मंजूर केली आहे. उक्त शासन मंजूर विकास योजनेमधे मौजा वरूड ता. वरुड येथील सर्व्हे नंबर २५८/१, २५८/१अ, २५८/१ब, २५८/२ मधील जागा आरक्षण क्रमांक ०७ (यापुढे ज्याचा निर्देश "उक्त आरक्षण" असा केला आहे.) मध्ये आठवडी बाजार या सार्वजनिक प्रयोजनाकरिता (यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा केला आहे.) आरक्षित करण्यात आली आहे. यापैकी वरूड सर्व्हे नंबर २५८/१, २५८/१अ, २५८/१ब, २५८/२ मधील एकत्रित क्षेत्र २२,४००.०० चौ. मी. (२.२४ हे.आर.) जमीन (यापुढे ज्याचा निर्देश "उक्त जमीन" असा केला आहे.) उक्त आरक्षणात आरक्षित करण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेला अनुसूची एक मधील अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची दोनमध्ये नमूद सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. मुख्याधिकारी, नगर परिषद, वरूड यांनी याबाबत भूसंपादन प्रस्ताव सादर केला आहे. तसेच उक्त वाचा संदर्भिय आदेशान्वये उक्त जमिनीचे संपादनाबाबत कार्यवाही करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द अधिसूचना क्रमांक एमआयएस-११/२०१४/सीआर-७७ (पार्ट-२)-अे-२ नुसार १०,००० (दहा हजार) हे. पेक्षा जास्त नसलेल्या भूसंपादनासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांना समूचित शासन म्हणून घोषित केले आहे .

त्याअर्थी आता, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्यांची खात्री पटली आहे. तसेच, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (२) अन्वये, (2) On receipt of such application, if the State Government is satisfied that the land specified in the application is needed for the public purpose therein speciied, or (if the State Government except in cases falling under section 49 land except as provided in section 113A) itself is of opinion that any land included in any such plan is needed for any public purpose it may make a declaration to that ffect in the Official Gazette in the manner provided in section 19 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 in respect of the said land. The declaration so published shall notwithstanding anything contained in the said Act, be deemed to be a declaration duly made under the said section (19) अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

तसेच, मुख्याधिकारी, वरूड यांचेकडील पत्र जावक क्र. २२८३/२०२५ दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ अन्वये, संचालक, नगर रचना पुणे यांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ च्या आदेशानूसार उक्त आरक्षण रद्द झाल्याबाबत आदेश पारित केला आहे. तसेच दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्र क्रमांक टीपीएस-२८२५-८३६-प्र. क्र.१६१-२०२५-नवि-३०, मा. अवर सचिव यांचे पत्राअन्वये वरील आरक्षण रद्द केलेल्या आदेशास अनुसरून कोणतीही कार्यवाही पुढील जरूर ते आदेश/सूचना शासन/ संचालनालयाच्या स्तरावरून मिळेपर्यंत करण्यात येवू नये असे नमूद केल्याचे कळविले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (२) व वरीलप्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ च्या पोटकलम (१) तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना अधिनियमाचे कलम १२६ (२) व १२६ (४) मधील तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे;

तसेच, अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे उक्त सार्वजनिक प्रयोजनाच्या आठवडी बाजारचे कामासाठी निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असुन, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियामान्वये जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लघु सिंचन कामे, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. भूसंपादन प्रस्तावाशी संबंधीत कलम ११ ची अधिसूचना, कलम १९ ची अधिसूचना व प्रारूप निवाडा मंजूरी इत्यादी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे न पाठविता भूसंपादन अधिकारी यांनी स्वतःचे स्तरावर कार्यवाही करून अंतिम निवाड्यासह भूसंपादनाची पुर्ण प्रक्रिया पार पाडावी असे मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालयीन परिपत्रक क्र. अ.का.-प्र.अ./-भूसंपादन-कावि. ३१८-२०२५, दिनांक ०८ जुलै, २०२५ अन्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार भूसंपादन प्रकरणात कार्यवाही करण्यात येत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०७-४७-२०२३-२४, मौजा वरुड, तालुका वरुड, जिल्हा अमरावती.

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक नंबर | अंदाजित संपादन क्षेत्र (स. मो. प्रमाणे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | २५८ पैकी | २२,४०० चौ.मी. (२.२४ हे.आर) |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | : | आरक्षण क्र. ०७ ( आठवडी बाजार ) आरक्षणाखालील जागा अधिग्रहित करणे. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | : | आठवडी बाजार कामाकरीता |
| समाजाला मिळणारे लाभ | : | लोकांना एकाच ठिकाणी विविध वस्तू मिळतात. थेट ग्राहक मिळतात, स्थानिक लोकांना रोजगार मिळतो ज्यामुळे समूदाय मजबूत होतो. तसेच, नगर परिषदेचे उत्पन्न वाढण्यास मदत होते. |

## अनुसूची-तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. — सबब माहिती निरंक

## अनुसूची-चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

सदर प्रकरणी घरे/कुटूंबे बाधित होत नाही.

सबब विस्थापन होत नसल्याने पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची ( पुनर्स्थापनेची ) आवश्यकता नाही.

**सुषमा चौधरी,**
उपजिल्हाधिकारी ( भूसंपादन ),
ल. सिं. कामे, अमरावती.

अमरावती :
दिनांक २४ एप्रिल, २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.